
भाजपा विजयाचे शिल्पकार

देवेंद्र फडणवीस... पान②

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १५६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१८ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## भाजपने कागदावर शिवसेना संपवली असेल, पण... उद्धव ठाकरे म्हणाले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** मुंबईत आमचा महापौर होणार आणि व्हावा अशी आमची एक इच्छा होती, आजही आहे. तो आकडा आम्ही आज तरी काही गाठू शकलेलो नाही, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. त्यांनी आज पत्रकार परिषद घेतली.

यावेळी त्यांनी महापालिका निवडणुकीच्या निकालावर प्रतिक्रिया दिली. या सर्व त्यांच्या खेळाला उत्तर देवून जे काही यश शिवशक्तीला मिळवून दिलं आहे त्याने सत्ताधाऱ्यांना घाम फुटला हे नक्की. कारण त्याने एक्झिट पोलचे आकडे असतील, किंवा आणखी आकडे असतील, त्यांनी एकही प्रयत्न सोडला नाही, असं उद्धव ठाकर म्हणाले.

मला एका प्रश्नाचं उत्तर मिळालं नाही. विधानसभेला किंवा लोकसभेला पंतप्रधान मोदींची सभा झाली होती. आमची शिवतीर्थावर सभा झाली. आपण सगळे जण साक्षीदार आहात शिवाजी पार्क कसं फुलून गेलं होतं, त्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांची सभा शिवतीर्थावर झाली. आमच्या सभेला गर्दी होती पण मतदान होत नाही. पण त्यांच्याकडे रिकाम्या खुर्च्या मतदान करु शकतात? हे न उलगलेलं कोडे आहे, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. त्यांनी गेल्या चार दिवसांत जो पैशांचा वाटप केला तो चार दिवसांचा नव्हता तर ते गेले चार वर्ष हे पैसा परेत होते. आमचे जे निवडून आलेले नगरसेवक होते त्यापैकी त्यांनी जवळपास अर्धे अधिक नगरसेवक त्यांच्या गळाला लावले होते. चार वर्षे त्यांनी त्यांच्या आमदारांना, नगरसेवकांना नरसेवक नसताना विकासनिधीच्या नावाने अमाप पैसा वाटला. निवडणुकीच्या तोंडावर प्रेशर कूकर, मिक्सर, साड्या वाटल्या. हा पैसा येतो कुठून?, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.

या पैशांच्या सोर्सच्या मागे इनकम टॅक्स, सीबीआय लागत कशी नाही? एवढं सगळं होऊनही अमाप पैसा वाटला जातो. मग २०१५ साली काळा पैसा नाहीसा व्हावा यासाठी मोदींनी जी नोटबंदी केली होती ती अयशस्वी झाली का? याचं उत्तर कोणीतरी शोधलं पाहिजे, असं ठाकरे म्हणाले.

भाजपने कागदावर शिवसेना संपवली असेल, पण जमिनीवरच्या शिवसेनेला ते संपवू शकत नाही, हे कालच्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीने आणि इतरही शिवसेनेला मतदान करणाऱ्या मतदारांनी दाखवून दिलं आहे. भाजप हा पक्ष कागदावर आहे, पण जमिनीवर नाही. कारण हा पक्ष जमिनीवर असता तर त्यांना पक्ष फोडावे लागले नसते. त्यांना पुसली जाणारी शाई वापरावी लागली नसती. त्यांना यंत्रणेचा दुरुपयोग करावा लागला नसता. नियम बदलावे लागले नसते, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

आज देखील साधे-साधे शिवसैनिक निवडून आले आहेत. प्रचंड साध्या धबधब्यासमोर निष्ठा कशी ताठ मानेने लढू शकते आणि जिंकू शकते हे आज दाखवलेलं आहे. सर्व मुंबईकरांना धन्यवाद देतो. मला मुंबईकरांकडे खास अपेक्षा नक्कीच होती, अशी खंतदेखील त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### 'निवडणूक आयुक्त ब्रह्मदेवाचा बाप नाही'

● शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना भवन येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना पत्रकारांनी निवडणूक आयुक्तांबद्दल प्रश्न विचारला, या प्रश्नाचं उत्तर देत असताना त्यांनी निवडणूक आयुक्तांवर निशाणा साधला. अशा निवडणूक आयुक्तांविरुद्ध जनता ॲक्शन घेईल. त्यांनी लोकांच्या भावनेचा खेळ करु नये. ते म्हणजे ब्रह्मदेवाचे बाप नाहीयत. त्यांनी लोकशाहीचा अपमान करु नये. लोकशाहीचा अपमान केला तर निवडणूक आयुक्तांनाही शिक्षा करावी लागेल. त्यांनी लोकभावनेचा आणि संविधानाचा अनादर करु नये, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

संविधानापेक्षा निवडणूक आयुक्त मोठे नाहीत. ते सुद्धा एक मतदार आहेत. त्यांनादेखील मतदानाचा अधिकार असतो. ते जर एका पक्षाला मतदान करु शकत असतील तर याचा अर्थ ते निष्पक्षपणे काम करु शकतात का? हा प्रश्न त्यांना विचारावा लागेल, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली.



## बीएमसी निवडणूक संपन्न : पालिका प्रशासनाने मानले मुंबईकरांचे आभार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत पार पडलेल्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत सर्व घटकांचे सहकार्य लाभले. मुंबईकर मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदानाचा हक्क बजावला. एकूणच संपूर्ण निवडणूक मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मुंबईकर नागरिक, सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, कार्यकर्ते, प्रसार माध्यम, सर्व यंत्रणांनी मोलाचे सहकार्य केले.

या सहकार्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी तसेच विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, सहआयुक्त (करनिर्धारण व संकलन) विश्वास शंकरवार, अपर जिल्हाधिकारी (कोकण विभाग) तथा महानगरपालिका निवडणूक समन्वयक सहायक फरोग मुकादम, सहायक आयुक्त (कर निर्धारण व संकलन) गजानन बेल्लाळे यांनी सर्व घटकांचे मनःपूर्वक आभार मानले.




बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ नगरसेवक निवडीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मतदान प्रक्रिया पार पडली. एकूण मिळून १० हजार २३१ मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मतदारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता तसेच रॅम्प व मार्गदर्शक सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. एकूण ६४ हजार ३७५ मनुष्यबळाच्या प्रभावी व्यवस्थापनासह ४ हजार ५०० स्वयंसेवकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविला.

या निवडणुकीत मुंबई महानगरातील १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदारांपैकी सुमारे ५४ लाख ७६ हजार ०४३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात पुरूष मतदारांची संख्या २९ लाख २३ हजार ४३३ इतकी; महिला मतदारांची संख्या २५ लाख ५२ हजार ३५९ तर इतर मतदारांची संख्या २५१ इतकी आहे. एकूण ५२.९४ टक्के मतदानाची नोंद झाली.

संपूर्ण निवडणूक कालावधीत बृहन्मुंबई महानगर पालिकेची सर्व यंत्रणा व अधिकारी-कर्मचारी, कामगार अहोरात्र कार्यरत होते. यासोबतच मुंबई पोलीस दलातील सुमारे ३० हजार अधिकारी व अंमलदार प्रत्यक्ष बंदोबस्तात कार्यरत होते. तसेच केंद्र शासन, राज्य शासन, विविध प्राधिकरणे, बँका आणि निमशासकीय संस्थांमधील अधिकारी-कर्मचारी यांनीही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी योगदान दिले.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि माननीय राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनानुसार अधिकारी व कर्मचारी, कामगार यांनी आपली जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडली.

मतदान प्रक्रियेत सहभागी झालेले निवडणूक अधिकारी, कर्मचारी, पोलीस यंत्रणा तसेच इतर संबंधित विभागांनी दाखविलेल्या शिस्तबद्ध व समर्पित कामगिरीबाबत महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी विशेष समाधान व्यक्त केले आहे. सर्व संबंधित यंत्रणांमधील समन्वयामुळे मतदान प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण होऊ शकली, असे त्यांनी नमूद केले.

लोकशाहीचा हा महत्त्वाचा उत्सव यशस्वी होण्यासाठी सर्व घटकांनी दाखविलेल्या जबाबदारीमुळेच निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह व प्रभावी ठरली आहे. भविष्यातही प्रशासकीय कामकाजात सर्वच घटकांचे अशाच प्रकारचे सहकार्य अपेक्षित असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी यांनी नमूद केले आहे.

## मुंबई पोलिसांसाठी, तब्बल ४५ हजार सरकारी घरं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४० ते ४५ हजार शासकीय निवासस्थाने उपलब्ध व्हावीत यादृष्टीने मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प राबविण्यास आज (१७ जानेवारी) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. या टाऊनशिप प्रकल्पाद्वारे सुमारे पाच कोटी चौरस फूट क्षेत्राचे विकसन करण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

**१०० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी देण्यास मान्यता**

या टाऊनशिपसाठी लागणारा ३० टक्के निधी शासन देणार आहे. तर उर्वरित ७० टक्के निधी एमएसआयडीसी शासन हमीद्वारे विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात उभारणार आहे. या प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी आणि प्रकल्प सुरु करण्याकरिता महामंडळास १०० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी देण्यास आज मान्यता देण्यात आली. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या व सुरक्षेची आवश्यकता लक्षात घेऊन, पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज व अद्ययावत वसाहती व निवासस्थानांची मोठी गरज आहे. यामुळे पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी अधिक तत्पर आणि कार्यक्षमरित्या कर्तव्य बजावू शकणार आहेत.

**पोलिसांना कार्यालयाजवळ निवासस्थान असणे आवश्यक**

मुंबई पोलीस दलात ५१ हजार ३०८ इतके मनुष्यबळ आहे. पोलीस दलाकडे उपलब्ध सेवा निवासस्थाने ब्रिटीशकालीन जुन्या व जीर्ण इमारतींमध्ये आहेत. उपलब्ध २२ हजार ९०४ सेवा निवासस्थानांपैकी सुमारे ३ हजार ७७७ निवासस्थाने वापरासाठी अयोग्य आहेत. याशिवाय दरमहा सुमारे चारशे ते पाचशेहून अधिक अधिकारी-कर्मचारी निवासस्थानांसाठी अर्ज करतात. निवासस्थाने उपलब्ध नसल्याने मुंबई पोलीस दलातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना दररोज प्रवास करून कामाच्या ठिकाणी यावे लागते. पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामांचे स्वरूप पाहता, त्यांना कार्यालयाजवळ निवासस्थान असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून टाऊनशिप प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे मुंबई पोलीस दलात नोकरीवर असलेल्या कर्मचाऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार? शरद पवारांच्या भेटीनंतर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, पुणे :** राज्यातील महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादीची कामगिरी अत्यंत सुमार दिसली. होम पिचवर, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादींचा दारूण पराभव झाला. भाजपच्या झंझावात या ठिकाणचा राष्ट्रवादीचा बुरूज ढासळला. दरम्यान महापालिका निवडणुकीनंतर आज सकाळीच अजितदादांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आले. कृषी प्रदर्शनाच्या उद्धघाटनाला आलेल्या अजितदादांनी या प्रश्नाला बगल दिली नाही तर थेट उत्तर दिले.

**●दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील?**

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची बैठक झाली का या प्रश्नाला अजितदादांनी थेट उत्तर दिले. अशी कुठलीही बैठक झाली नाही. असे सांगत दादांनी या विषयावर भाष्य टाळले. तर आज कृषी प्रदर्शन २०२६ चं उद्धघाटन होतं. आपण इथले लोकप्रतिनिधी आहोत. कुलगुरू येणार होते. मला सांगण्यात आले की शरद पवार पण आले आहेत. त्यामुळे आम्ही तिथं त्यांच्या घरी गेलो. मला पण शेतीची आवड आहे. कुटुंब म्हणून आम्ही एकत्र आहोतच. सध्या तरी आम्ही महायुती म्हणून काम करतोय. केंद्रात पण एनडीएचं सरकार आहे आणि इथं महायुतीचं सरकार आहे, असे अजितदादांनी सांगितले.

**●जिल्हा परिषद निवडणुकीत एकत्र?**

गौतम अदानी येऊन गेल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील का असे विचारले असता, गौतम अदानी हे उद्योगपती आहेत. ते एआय सेंटरच्या उद्धघाटनाला आले होते. त्यांचा याच्याशी संबंध काय असा सांगत कुटुंब म्हणून आम्ही एकत्र आहोत असे अजितदादांनी सांगितले. १२ जिल्हा परिषदेच्या निवडणुका लागलेल्या आहेत. स्थानिक नेते याविषयीचा निर्णय घेतील. जिल्हा परिषद निवडणुकीबाबत स्थानिक नेत्यांना अधिकार देण्यात आले आहेत. स्थानिक कार्यकर्ते त्याविषयीची निर्णय घेतील असे अजितदादा म्हणाले.

**●पराभवाचं चिंतन करणार**

शेवटी मतदार राजा हा सर्वात महत्त्वाचा असतो. प्रयत्न करणं हे प्रत्येक राजकीय पक्षाचं काम असतं. ज्याने त्याने भरपूर प्रयत्न केले. परंतू भाजपला अतियश चांगलं यश मिळालं. भाजपचं मोठं अभिनंदन, मनापासून कौतुक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपनं या निवडणुका लढवल्या.त्याला खूप चांगला प्रतिसाद झाला. इतरांचा पराभव झाला. माझं स्वतःचं असं गणित आहे की, पराभवानं खचून जाऊ नये. पुन्हा आपलं काम करत राहायचं असते. सगळेच म्हणत होते की राष्ट्रवादीला चांगलं वातावरण आहे. पण पराभव का झालं याचं सर्व मिळून चिंतन करू. आमचे अंदाज चुकले, अशी प्रतिक्रिया अजितदादांनी महापालिका निवडणुकीतील पराभवानंतर दिली. ईव्हीएमवर अनेकांनी आक्षेप घेतल्याबाबत अजितदादांनी महत्त्वाचे वक्तव्य केले. ते म्हणाले की मला यामध्ये पडायचं नाही. काय होतं की पराभव झालं की ईव्हीएमला दोष द्यायचा आणि यश आलं की ईव्हीएमबाबत बोलायचं नाही, असं अजितदादा म्हणाले. तर बोटावरील शाई पुसल्याप्रकरणी अजितदादांनी भाष्य करणे टाळले.

## वरिष्ठ जीएसटी अधिकारी कारमध्ये मृतावस्थेत आढळले



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, बीड :** बीड शहरालगत आज एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गेल्या २४ तासांपासून बेपत्ता असलेल्या एका वरिष्ठ जीएसटी अधिकाऱ्याचा मृतदेह एका खाजगी चारचाकी गाडीत संशयास्पद अवस्थेत आढळून आला आहे. या घटनेमुळे शासकीय वर्तुळात आणि परिसरात मोठी खळबळ उडाली असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. सचिन नारायण जाधवर (वय ४५, रा. बीड) असे मृत अधिकाऱ्याचे नाव आहे. जाधवर हे वस्तू व सेवा कर विभागात महत्त्वाच्या पदावर कार्यरत होते. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, सचिन जाधवर हे शुक्रवारी रात्रीपासून बेपत्ता होते. ते वेळेत घरी न परतल्याने आणि त्यांचा संपर्क होऊ न शकल्याने कुटुंबीय काळजीत होते. रात्रभर शोध घेऊनही ते न सापडल्याने अखेर त्यांच्या नातेवाईकांनी बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याची अधिकृत तक्रार दाखल केली होती.

# सौभाग्याचं लेणं : कुंकू



मकर संक्रांत सण झाला कि सर्वत्र हळदी कुंकू समारंभांना सुरुवात होते. रथसप्तमी पर्यंत चालणाऱ्या या उत्सव काळात सर्वत्रच्या स्त्रिया उत्साहाने सहभागी होतात. विविध महिला मंडळे, सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था यांसह राजकीय पक्षांच्या वतीनेही हळदी कुंकू समारंभ साजरे केले जातात. महापालिका निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक यंदा हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने प्रभागातील महिला मतदारांच्या भेटीला नक्कीच जातील.

हळदी कुंकूंच्या दिवसांत कधी नव्हे ते स्त्रियांचे संघटन पाहायला मिळते. यावेळी स्त्रियांना तिळगुळ वाटपासह वाण म्हणून काहीनाकाही वस्तू दिली जाते. या सर्वांत प्रमुख कृती असते ती हळद आणि कुंकू लावण्याची. सौभाग्याचे आणि समृद्धीचे प्रतिक म्हणून कपाळी हळद आणि कुंकू लावले जाते. स्त्रियांच्या दोन भुवयांमध्ये आज्ञाचक्राच्या स्थानी लावले जाणारे हळद कुंकू श्रद्धेने लावले जाते. प्रत्येक स्त्रीमध्ये दुर्गादेवीचे तत्व असते, त्यामुळेच स्त्रीला 'शक्ती' असेही म्हणतात.

स्त्रिया एकमेकींना हळद कुंकू लावतात म्हणजे एकमेकांतील दुर्गादेवीच्या तत्वाचे पूजन करतात. संपूर्ण चेहऱ्याच्या संवेदनांसाठी जबाबदार असणारा मज्जातंतू हा याच भागात असतो. दोन भुवयांच्या मध्यभागी मज्जातंतूच्या एकूण तीन शाखा असतात. या जागेवर दाब पडल्याने सायनसचा त्रास कमी होतो. डोळ्यांच्या महत्त्वाच्या नसा देखील याच भागात असतात आणि या नसा डोळ्यांच्या स्नायुंशी जोडलेल्या असतात. या ठिकाणी थोडासा दाब दिल्यास दृष्टीही चांगली राहते आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते. माणसाच्या मनावर ताण आला कि कपाळावर आठ्या पडतात.

शरीरातला सगळ्या गोष्टींचा ताण हा कपाळावरील त्या बिंदूच्या ठिकाणी जमा होतो. म्हणूनच त्या बिंदूला थोडीशी उत्तेजना दिल्यास आपला ताण कमी होतो, दृष्टी सुधारते आणि निद्रानाशही कमी होतो. त्यामुळे बिंदूदाबन, योगशास्त्रदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्याही कुंकू लावण्याचे अनेक लाभ आहेत. हळद आणि चुना किंवा हळद आणि लिंबू यांच्या मिश्रणातून कुंकू बनवले जाते. त्यामुळे कपाळी कुंकू लावण्याचे आयुर्वेदिक लाभही आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांसह पुरुषांनीही कपाळाला कुंकू लावण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आधुनिकतेच्या नावाखाली पूर्वापार चालत आलेल्या लाभदायक प्रथा हळूहळू लोप पावत चालल्या आहेत.

हल्लीच्या स्त्रिया साडी केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांना नेसतात तसे कुंकूही केवळ हळदी कुंकू समारंभातच लावले जाऊ लागले आहे. कुंकूची जागा आता टिकलीने घेतली असून हळूहळू तिही नष्ट होण्याच्या मार्गांवर आहे. हल्लीच्या स्त्रियांवर हिंदी चित्रपटातील अभिनेत्रींचा प्रभाव अधिक असल्याने आज अनेक स्त्रिया उजाड माथ्याने वावरताना दिसतात. काही स्त्रिया, मुली टिकली तर लावतात मात्र ती दुर्बीणीने शोधावी लागेल अशा आकाराची लावतात. आपल्या हिंदु प्रथा परंपरा या मानवाचे सर्वांगीण हित साधणाऱ्या असून त्या सर्वांमागे अध्यात्म, मानस आणि आरोग्यशास्त्र दडलेले आहे. आज ते विज्ञानाच्या आधारावरही सिद्ध होत आहे. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन त्यांना त्यागण्यापेक्षा त्यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब करणे हिताचे आहे. हळदी कुंकू साजरी करण्याच्या प्रथेतील व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन स्त्रियांनी प्रतिदिन कपाळावर कुंकू लावण्याची सवय स्वतःला लावून घायला हवी.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# नवा नागपूर करार...







नागपुरातील विदर्भ साहित्य संघ या बहुप्रतिष्ठित संस्थेचा स्थापनादिन कालच भरगच्च उपस्थितीत झाला. एरवी वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची निवडणूक केव्हा होते, ते कळत नाही. यंदा तशी स्थिती नाही. लोकसंपर्कात हातोटी असणारे, दिवंगत मनोहर म्हैसाळकर यांनी अनेक वर्षे साहित्य संघाची धुरा सांभाळली. सध्याचे अध्यक्ष प्रदीप दाते यांची छबी आधी म्हैसाळकरांच्या पादुका सांभाळणारी व्यक्ती अशी होती. ते नवखेपण संपले आहे. उत्कर्ष आणि अवरोध हा तसाही समातंर प्रवास असतो. ही निवडणूक त्यामुळेच रंगणार आहे.

रवींद्र शोभणे हा विदर्भ साहित्य संघाचा चेहरा आहे, असे म्हैसाळकरांनी म्हटले होते. मोठ्या साहित्यिक पदांवर त्यांनी काम केले आहे. विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाने मात्र त्यांना आजवर हुलकावणी दिली. सध्या राज्यात महापालिका निवडणुकांची धुमश्चक्री सुरू असल्याने 'बिनविरोध' निवडींचा मुद्दा पेटला आहे. लोकशाहीला शह देण्याचा हा प्रकार असल्याची टीका झाली. आता साहित्य संघात काय होते हे लवकरच कळेल. अध्यक्ष प्रदीप दाते यांना सचिव विलास मानेकर यांची चांगली साथ लाभली. सप्तक या सांगीतिक संस्थेत सक्रिय असलेले मानेकर यांनी दाते यांना सांभाळून घेतले. संघरचना 'बेसूर' न होऊ देण्याची पुरेपूर काळजी त्यांनी घेतली. मराठी वायय चळवळीतील 'पत्रपंडित' श्रीपाद भालचंद्र जोशी निवडणूक धाम धुमीत कायम अनामिक बेटावरचे प्रवासी राहिले. त्यांच्या नावाखेरीज विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीची बातमी अपूर्ण असते. सर्व गटांमध्ये सद्भावना असलेल्यांमध्ये व्यावसायिक, लेखक आशुतोष शेवाळकर यांचा समावेश होतो. संस्थांमध्ये काम करण्याचा 'स्वभाव आणि शिस्त' आपल्यात नसल्याचे स्पष्ट करीत नेहमीप्रमाणे त्यांनी अन्य इच्छुकांना पुढे चाल दिली आहे. गिरीश गांधी आणि डॉ. पिनाक दंदे या दोघांनीही वि. सा. संघाच्या शताब्दी वर्षांत आश्रयदाते म्हणून जबाबदारी सांभाळली होती. वयोमानानुसार गिरीश गांधींनी इतर संस्थांचाही व्याप कमी करीत निवृत्तीचा मार्ग पत्करला आहे. दंदे फाउन्डेशनने साहित्य प्रांतात अनेक कार्यक्रमांचा धडाका लावला आहे. डॉ. दंदे हे अध्यक्षपदासाठी चर्चेत आलेले नवे नाव आहे.

शताब्दी पार केलेल्या विदर्भ साहित्य संघाला वर्धा साहित्य संमेलनात दहा कोटींचा निधी देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'नागपूर करारा'ला जागले. धनवटे रंगमंदिराच्या ठिकाणी उभारलेल्या सांस्कृतिक संकुलाबद्दलचे बहुतेक आक्षेप संपले आहेत. रंगमंदिराची रया वेगळी होती. डॉ. रूपा कुळकर्णी बोधी यांचे गाजलेले धर्मांतर त्या ठिकाणी झाले होते. नव्या संकुलातही कार्यक्रमांची भरमार असते. यंदा संक्रातीचा मुख्य समारोह पाचव्या मजल्यावरील भव्य सभागृहात हवा होता, ही इच्छा व्यक्त झाली. लोकेच्छांकडे डोळसपणे न बघण्याचा आरोप साहित्य संघावर नेहमीच होतो. वेळेपूर्वीच खुर्च्यांवरील धूळ साफ केली तर आरोप कमी होतात, हा बोध तेथील धुरीण आता नक्की घेतील. साहित्य संघाने पैस वाढवावा. स्पर्धक आणि अंतस्थ शत्रूंतील भेद ओळखावा.

मध्य देशीय अस्तित्वाला जागून हिंदी साहित्य संमेलनाची सोबत त्यांना घेता येईल. विदर्भ संशोधन मंडळाचा स्नेह पुनरुज्जीवित करता येईल. मंडळाची पहिली सभा १४ जानेवारी १९५४ रोजी झाली होती. डॉ. भवानीशंकर नियोगी, डॉ. वा. वि. मिराशी, प्रा. श्री. ल. पांढरीपांडे यासारखे दिग्गज त्यात होते. १९६५पर्यंत मंडळाचे कार्यालय वि. सा. संघातच होते. वेस्ट हायकोर्टवरील संशोधन मंडळ उपक्रमशील आहे. इमारत जीर्णत्वाकडे झुकली आहे. अशा साहित्य संस्थांची मोट बांधण्याचा 'नवा नागपूर करार' साहित्य संघाने करावा. टीकेने व्यथित होऊ नये. तसेही सांस्कृतिक संकुलात पाऊल न ठेवणाऱ्यांचे वि. सा. संघाच्या इवल्याशाही 'फाउल'कडे बारीक लक्ष असते.

# सुरसम्राट कुंदनलाल सैगल !!



हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ गायक व पहिले सुपरस्टार कुंदनलाल सैगल यांची आज पुण्यतिथी. कुंदनलाल सैगल यांचा जन्म ११ एप्रिल १९०४ रोजी जम्मू येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील अमरचंद सैगल हे जम्मू काश्मीर संस्थानात मामलेदार होते तर आई केसरबाई या गृहिणी होत्या. त्यांच्या आईला संगीताची खूप आवड होती.

धार्मिक कार्यक्रमात त्या भजन, किर्तन गात त्यामुळे लहान वयातच कुंदनलाल सैगल यांच्यावर संगीताचे संस्कार झाले. त्यांच्या आई याच त्यांच्या संगीतातील पहिल्या गुरू होत्या. कुंदनलाल सैगल यांनी संगीत कलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले नव्हते पण युसुफ नावाच्या व्यक्तीकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक धडे गिरवले होते. अर्थजनासाठी त्यांनी टाईपरायटर विक्रेत्याचे काम केले पण संगीतावरील प्रेम ापोटी त्यांनी ते काम सोडून छोट्या मोठ्या मैफलीत गायला सुरुवात केली. त्यांच्या गायनाने प्रभावित होऊन बी. एन. सरकार यांनी त्यांना न्यू थिएटर साठी करारबद्ध केले. १९३२ साली त्यांनी चित्रपटात अभिनय करायला सुरुवात केली. पण त्यांचे पहिले तीनही चित्रपट चालले नाही. १९३३ साली आलेला पुरण भगत नावाचा चित्रपट मात्र खूप गाजला. या चित्रपटाने त्यांची गायक आणि नायक म्हणून चित्रपट सृष्टीला ओळख करून दिली. १९३५ साली आलेल्या देवदास या चित्रपटाने त्यांना सुपरस्टार बनवले. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. या चित्रपटातील त्यांचा अभिनयही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. दीदी, साथी, सूरदास, तानसेन, जीवनमृत्यू हे त्यांचे चित्रपटही खूप गाजले. १९४६ साली प्रदर्शित झालेला शारजहाँ हा चित्रपट देखील खूप गाजला. १९४७ साली आलेला परवाना हा चित्रपट त्यांच्या मृत्यूनंतर प्रदर्शित झाला.

**श्याम ठाणेदार, दौंड जि.पुणे**
**संपर्क : ९९२२५४६२९५**

हा चित्रपट देखील यशस्वी झाला. एक बंगला बने न्यारा..., करू क्या आस निरास भाई..., सो जा राजकुमारी सो जा..., बाबुल मोरा...., जब दिल ही तूट गया... ही त्यांनी गायलेली गाणी अजरामर झाली. आजही ही गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. कुंदनलाल सैगल यांच्या गायनाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या गायनातील उत्स्फूर्तता आणि सहजता, आर्त दर्दभरा आवाज आणि प्रत्येक गाणे भावपूर्णतेने गाण्याची वैशिष्ट्यपूर्ण शैली त्यामुळे त्यांची गाणी रसिकांच्या मनाला भिडत. कुंदनलाल सैगल यांनी भजन, किर्तन, ठुमरी, गझल, अंगाई गीत, बाल गीत, विरह गीत अशी सर्व प्रकारची गाणी गायली. हिंदी सोबतच त्यांनी उर्दु, बंगाली, तामिळ या भाषेतील चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी ३६ चित्रपटात भूमिका केल्या तर १८५ गाणी गायली. मुकेश, मोहम्मद रफी या महान गायकांवर सुरवातीच्या काळात सैगल यांच्याच गायन शैलीचा प्रभाव होता. हे महान गायक सैगल यांनाच आपला आदर्श मानत. १८ जानेवारी १९४७ रोजी कुंदनलाल सैगल यांचे निधन झाले. कुंदनलाल सैगल यांचे निधन होऊन आज ७९ वर्षे झाली तरीही त्यांच्या गायनाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. कुंदनलाल सैगल हे खऱ्या अर्थाने भारताचे सुरसम्राट आहेत. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# भास्कर राठोडची सैन्य दलात भरती !

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१७, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील भवानी तांडा येथील तरुण गरिबी, हालअपेष्टा आणि संघर्षावर मात करत भास्कर बाबूराव राठोड याने अत्यंत कमी वयात भारतीय सैन्य दलात नोकरी मिळवून भवानी तांडयाचे नाव उज्वल केले आहे. भास्करच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असून परिसरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



भास्करचे वडील बाबू रुपाला राठोड हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अपुऱ्या उत्पन्नातही त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम घेतले. मजुरीचे कष्ट आणि शिक्षणाची साथ यामुळेच आज मुलाने यश मिळवले, अशी भावना गावकऱ्यांतून व्यक्त होत आहे. वडिलांच्या कष्टाचे चीज भास्करने सैन्य दलात भरती होऊन केले असल्याचे बोलले जात आहे.

भास्करच्या यशाबद्दल तरुणांमध्ये प्रेरणादायी चर्चा होत असून तो अनेकांसाठी आदर्श ठरत आहे. या यशाबद्दल स्व. शंकरराव पवार प्रतिष्ठान तसेच गावकऱ्यांच्या वतीने लवकरच भास्कर राठोड व त्यांचे आई-वडीलांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती भवानी तांड्याचे पोलीस पाटील (प्र.) अमर शंकरराव पवार यांनी दिली. भास्करच्या यशामुळे भवानी तांड्याचा अभिमान वाढला असून, संघर्षातून यश मिळवता येते याचे जिवंत उदाहरण त्याने घडवले आहे.

# भाजपा विजयाचे शिल्पकार : देवेंद्र फडणवीस

नुकत्याच महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकेच्या निवडणूका पार पडल्या. यामध्ये २४ ठिकाणी भाजपा किंवा महायुतीची सत्ता आली आहे. या विजयाचे शिल्पकार आहेत देवेंद्र फडणवीस . त्यांनी महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला. त्यांनी या निवडणुकीत एकूण ३५ सभा घेतल्या. व अनेक ठिकाणी रॉड शो घेतले विधानसभेच्या यशानंतर महायुतीचे हे मोठे यश म्हणावे लागेल . फडणवीस यांच्या विकासाचे व्हिजन ला सर्व जनतेने मान्यता दिली आहे. विकासाभिमुख राजकारण करत त्यांनी हे यश मिळविले आहे. जनतेला पायाभूत सुविधा देऊन त्यानी विकास साधला आहे. समृदी महामार्ग,पुणे व मुंबई येथे मेट्रोचा विकास, जलयुक्त शिवार, कोस्टल रॉड अटळ सेतू अशा काही योजनांमुळे महाराष्ट्र एका विकासाच्या नवीन वळणावर उभा आहे. विशेषतः ही कामे जनतेपुढे मांडून त्यांनी जनतेची मत रूपाने मान्यताही घेतली आहे. राज्यातील औधोगिक प्रगती साधण्यात त्यांच्या मंत्रिमंडळाने अनेक गोष्टी केल्या आहेत. अनेक परदेशी कंपन्यांची गुंतवणूक त्यांनी घडवून आणली आहे. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. डिजिटल महाराष्ट्र या सारख्या योजनांनी त्यांनी अनेक तरुणांचा विश्वास संपादन केला आहे. विधानसभेच्या वेळी सुरु झालेली लाडकी बहीण योजना आजपर्यंत चालू आहे. साहजिकच यामुळे अनेक लाडक्या बहिणीना आर्थिक पाठबळ लाभले आहे. शेतकरी सन्मान योजनांचे थेट लाभ अनेकांना मिळत आहेत. मुंबई महानगर पालिकेची एकहाती सत्ता घालवून महायुतीची सत्ता आणण्यात फडणवीस यांचे मोठे योगदान आहे.

निवडणुकीच्या काळात त्यांच्यावर अनेक वेळा टीका झाली पण त्यांनी त्याकडे विशेष लक्ष न देता अत्यंत संयमी पणे प्रचार करून यश खेचून आणले अनेक वेळा मित्र पक्षातील अनेकांनी त्यांच्यावर टीका केली होती. शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात त्यांचे नेतृत्व स्वीकारले आहे. विरोधकांनी केलेल्या टीकेला त्यांनी आकडेवारी व विकास या दोन सूत्रावरच प्रचार केला. व्हिजन २०४७ चा विकास आराखडा त्यांनी जनतेपुढे मांडला त्याची जनतेला प्रचंड पसंती पडली. त्यांच्या अनेक सभांना मोठी गर्दी होत असे. हे त्यांच्यावर जनतेचा विश्वास असल्याचे दाखविते. निवडणुकीत मित्र पक्षांना बरोबर जाताना भाजपा कसा वाढेल याचाही त्यांनी विचार केला. अत्यंत संयमी भाषेत ते सभेत त्यांच्यावरील टीकेला उत्तर देत होते. अनेक ठिकाणी त्यांनी जनतेशी थेट संवाद साधला होता. हिंदुत्व सारख्या मुद्यांनी विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठविली. पण त्यास त्यांनी सडेतोड उत्तरे दिली. आपल्या सरकारने केलेल्या कामाचा तपशील त्यांनी जनतेपुढे मांडला. एक चांगला प्रशासक म्हणून त्यांची प्रतिमा जनतेला भावली. टीकेला त्यांनी अत्यंत संयमी भाषेत उत्तरे दिली. त्यांचे यश हे एका विभागापुरते मर्यादित नाही तर महाराष्ट्रातील सर्व भागात त्यांची लोकप्रियता पोहचली आहे. त्यामुळे या महानगर पालिकेच्या निवडणुकीत सर्व पक्ष एकत्रित येऊनही काही यश विरोधी आघाडीकडी पडू शकले नाही. एकूणच देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रभर प्रचार करून जनतेपुढे विकास, मांडला आहे. या विजयाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीसच आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

**- शांताराम वाघ पुणे**

## धक्का...

निवडणूकी बसता
प्रस्थापितां धक्का
उतरून जातो रंग
असो कसा पक्का

समोरच्या चिन्हांस
जोरा बसे शिक्का
वाटले नाही कुणा
जिंकूनजाई लुक्का

कमरे खाली आला
मतदानाचा टक्का
अपयश येई पदरी
कपाळा तो बुक्का

जाता खुर्ची हातून
चुके काळीजठोका
आपलेचं साथीदार
देती आपणा धोका

ते पलटे उलटे डाव
गद्दारा मिळे मोका
महाकटात सामील
मानला ज्यालासखा

झाक आपल्या चुका
दुस-याचे पहा वाका
गेले सारे सिमा पार
मारत बसायचे हाका

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

# थोडक्यात

## दे.माळी येथील मराठी शाळेत अनोखा उपक्रम!

### पालक-पाल्य व शिक्षक यांच्यात विचारांची देवाणघेवाण...



**अक्षराज : रवींद्र सुरुशे**

**दि.१७, मेहकर (बुलडाणा) :** जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा देऊळगाव माळी येथे शिक्षकांनी अनुभव उपक्रम राबवून पालक-शिक्षक व विद्यार्थी यांच्या विचारात देवान-घेवाण करण्यात आली. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार केंदळे मॅडम, भराड मॅडम, सुरवाडे मॅडम, इनामदार मॅडम, व आधी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम राबवून यानिमित्ताने विचारांची देवाणघेवाण करण्यात आली. आपल्या पाल्याविषयी माहिती देऊन त्यांच्या मातांना या निमित्ताने संबोधन करण्यात आले. व महिलांना भेटवस्तू देऊन त्यांचे शाळेत स्वागत करण्यात आले. या निमित्ताने का होईना परंतु महिला खूप मोठ्या प्रमाणात शाळेत येऊन महिला शिक्षकांनी विचारांची देवाणघेवाण घडवून आणली. शाळेतील आत्तापर्यंतचा हा पहिलाच हळदीकुंकवाचा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत मगर, व समस्त व्यवस्थापन समितीचे सदस्य माता पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उपक्रमाची सर्वत्र कौतुक होत आहे. अशाच प्रकारचे नवनवीन उपक्रम राबवून मराठी शाळेविषयी गोडी वाढवावी अशी अपेक्षा गावकऱ्यांकडून होत आहे.

## संजय गांधी निराधार योजना समितीच्या सदस्य पदी रुपेश पवार यांची निवड



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१७, दापोली (रत्नागिरी) :** संजय गांधी निराधार योजना समितीच्या मंडणगड तालुका समिती सदस्य पदी दिव्यांग संघटना मंडळाचे अध्यक्ष तसेच विन्हे गावचे उपसरपंच दिव्यांगाचे प्रेरणास्थान व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे रुपेश वामन पवार यांची अपंग प्रवर्गातील अशासकीय प्रतिनिधी म्हणून संजय गांधी निराधार योजना समिती मंडणगड तालुका सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. रुपेश पवार हे मंडणगडमध्ये दिव्यांग व निराधार मदत केंद्र चालून खऱ्या अर्थाने दिव्यांगाना व निराधारणा न्याय निवडून मिळवून देण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू असतात त्यांच्या निवडीबद्दल मंडणगड तालुक्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## तमन्ना भाटियाच्या या गाण्याने रचला इतिहास, यूट्यूबवर १०० कोटींपेक्षा जास्त व्ह्यूज

सध्या बॉक्स ऑफिसवर अनेक चित्रपट प्रदर्शित होत आहेत. मात्र, यामधील काही चित्रपट असे आहेत की ज्यांमधील गाणी इतकी प्रसिद्ध झाली की ती एका रात्रीत सुपरहिट ठरली. ही गाणी सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आली. अशातच आता आणखी एका गाण्याची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात होत आहे. या गाण्याने तब्बल १ अब्ज व्ह्यूज मिळवले असून तो लाखो चाहत्यांचं आवडतं गाणं आहे.



दरम्यान, हे गाणं बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री जिने आपल्या दमदार अभिनयाने लाखो प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. तिचे नाव तमन्ना भाटिया आहे. सध्या ती खूप चर्चेत आहे. अनेक चित्रपटांमधील तिच्या आयटम साँग्सला आणि तिच्या डान्सला प्रेक्षकांनी नेहमीच भरभरून प्रेम दिले आहे. याच प्रेमाचा मोठा पुरावा म्हणजे तिच्या एका गाण्याने यूट्यूबवर १ अब्ज (१००० मिलियन) व्ह्यूजचा टप्पा गाठला आहे. हा एक मोठा विक्रम आहे. हे गाणे म्हणजे २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या सुपरहिट चित्रपट 'स्त्री २' मधील 'आज की रात'. या गाण्यात तमन्ना भाटियाने केलेला आयटम डान्स प्रचंड व्हायरल झाला होता. सोशल मीडियापासून ते यूट्यूबपर्यंत या गाण्याने अक्षरशः धुमाकूळ घातला आणि आता अधिकृतपणे १ अब्जांहून अधिक व्ह्यूज मिळवत एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

या यशाने भारावून गेलेल्या तमन्ना भाटियाने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक खास पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने एका व्हिडिओद्वारे १ व्ह्यूजपासून १ अब्ज व्ह्यूजपर्यंतचा प्रवास दाखवला आहे. कॅप्शनमध्ये तिने आपल्या चाहत्यांचे मनापासून आभार मानत मिळालेल्या प्रेमासाठी "Thank You" असे लिहिले आहे. तिच्या या पोस्टवर चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होत आहे.

**स्त्री २ चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद...**

दरम्यान, 'स्त्री २' हा चित्रपट २०२४ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि बॉक्स ऑफिसवर त्याने जबरदस्त कामगिरी केली. या चित्रपटाने हिंदी बॉक्स ऑफिसवर ६०० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली होती. चित्रपटाची कथा, कलाकारांचा अभिनय आणि गाणी यांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

उल्लेखनीय म्हणजे 'स्त्री २' हा २०१८ साली प्रदर्शित झालेल्या सुपरहिट चित्रपट 'स्त्री'चा सिक्केल आहे. पहिल्या भागाच्या यशानंतर प्रेक्षक या सिक्केलची आतुरतेने वाट पाहत होते आणि 'स्त्री २' ने ती अपेक्षा पूर्ण करत मोठे यश मिळवले.

# टाकळी ढोकेश्वर येथे चाचा नेहरू बाल क्रीडा स्पर्धा उत्साहात




टाकळी ढोकेश्वर येथिल बाल महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल आदर्श ग्रामीण महिला मंडळ संचलित निराधार गोकुळ बालसदन मैदानावर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत आयोजित जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवा २०२५-२०६ क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव जिल्हा प्रमुख व न्यायाधीश योगेश पैठणकर व बालकल्याण समितीचे अध्यक्ष ॲड जयंतराव ओहोळ, यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम, आदर्श गाव योजनेचे महेश पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या शासकीय स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार, उन्मार्गी, निराश्रित मुले व इतर संस्थाबाह्य बालकांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देऊन बालकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी बालकांमध्ये परस्पर आदर, बंधुभाव तसेच सांघिक भावना वाढीस लागण्यासाठी टाकळी ढोकेश्वर येथिल आदर्श ग्रामीण महिला मंडळ दरवर्षी चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. चाचा नेहरू बाल महोत्सव कार्यक्रम १४ खेळ प्रकारांमध्ये ७०० विद्यार्थी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय व स्वयंसेवी ३८ बालगृह संस्थामधील ६ ते १८ वयोगटातील शाळांमधील बालकांनी सहभाग नोंदवला आहे.

तीन दिवसीय जिल्हास्तरीय महोत्सवात शुक्रवारी पहिल्या दिवशी मैदानी खेळ, बुद्धिबळ, निबंध लेखन, वकृत्व, भाषण, कविता, वाचन सायंकाळी जादूचे प्रयोग, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. तर दुसऱ्या दिवशी मैदानी खेळ कब्बडी, खोखो,४०० मी रिले,१०० मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक व नंतर सायंकाळी वैयक्तिक व समूह नृत्य, सांस्कृतिक व बौध्दिक अशा विविध स्पर्धांचा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान महोत्सवात सामावेश असलेल्या जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत शासकीय स्वयंसेवी संस्थांच्या निराधार विद्यार्थी तसेच कर्मचारी व कार्यालयातील अधिकारी व्यक्तींना तीन दिवस निवासी राहण्याची व जेवणाची सोय आदर्श ग्रामीण महिला मंडळ संचलित नवीन गोकुळ बालसदन संस्थेच्या वतीने करण्यात आली होती.

या सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आदर्श ग्रामीण महिला मंडळ अध्यक्षा मंगल झावरे तसेच अहिल्यानगर महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांच्यासह बाल विकास विभागाच्या स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत आहेत.

# महापालिकेतही 'भाजप'च बाहूबली..!!

**निवडणूक विशेष...**

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा निकाल शुक्रवारी हाती आला.या निकालांमध्ये भाजपप्रणित महायुतीने २० हून अधिक महापालिकांवर एकहाती सत्ता मिळवत विधानसभेपाठोपाठ विजयाचा झंझावात इथेही कायम ठेवला आहे. नगरपरिषदा-पंचायत समिती निवडणुकांप्रमाणेच या निवडणुकांतही प्रामुख्याने सत्ताधारी महायुतीतील भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने एकमेकांचे हात पकडण्याऐवजी एकमेकांच्या गळ्यात तंगड्या टाकणे पसंत केले होते.

हेच यंदाच्या महापालिका निवडणुकीचे वैशिष्ट्य ठरले. मुंबईत भाजप-शिंदे गट विरुद्ध ठाकरे गट, वसई विरारमध्ये भाजप विरुद्ध बहुजन विकास आघाडी, भिवंडी-निजामपूरमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, परभणीमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस, तर लातूरमध्ये काँग्रेस-वंचित विरुद्ध भाजप अशा महापालिकांमध्ये सत्ताधारी विरुद्ध विरोधी पक्षात सरळ लढती बघायला मिळाल्या. या लढतींचा अपवाद वगळल्यास इतर महापालिकांमध्ये विरोधी पक्षांना बाजूला सारून सत्ताधारी पक्षातल्या तिन्ही घटक पक्षांनीच एकमेकांना तगडे आव्हान दिले. त्यातही महाराष्ट्रातील सगळ्या लढती एका बाजूला आणि मुंबई महापालिकेची लढत दुसऱ्या बाजूला एवढी हवा एकट्या मुंबई महापलिका निवडणुकीने तयार केली होती. मागच्या ३० वर्षापासून मुंबई महापालिकेवर भाजपच्या साथीने शिवसेनेचा भगवा फडकत होता.

२०१४ नंतर राज्यातल्या सत्तेत भलेही भाजप मोठा भाऊ बनला असला, तरी मुंबई महापालिकेच्या ७२ हजार कोटी रुपयांच्या तिजोरीच्या चाव्या शिवसेनेच्याच हाती होत्या. २०१७ च्या निवडणुकीत भाजप आणि तत्कालीन एकसंध शिवसेना वेगवेगळे लढले होते. भाजपने ही लढत बरोबरीत सोडवून मुंबईतल्या वाढत्या ताकदीची बेंडकुळी शिवसेनेला तेव्हाच फुगवून दाखवली होती. मात्र, चुलत भावाच्या मनसेचे काही नगरसेवक फोडून संख्याबळ वाढवत उद्धव ठाकरेंनी कसेबसे महापौरपद राखले होते. तेव्हापासून भाजप मुंबई महापालिका ताब्यात घेण्यासाठी जंगजंग पछाडत होता.



२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर बदललेल्या सत्ता समीकरणांनी खुर्ची बुडाखाली घेण्यासाठी पारंपरिक युत्या-आघाड्यांच्या, जनतेच्या आशा-आकांक्षांच्या राखरांगोळ्या केल्या. याच काळात मविआचे मुख्यमंत्री म्हणून विराजमान झालेल्या उद्धव ठाकरेंना राज्यात तर सोडाच परंतु, पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या मुंबई-ठाण्यातही पक्षाला ना रसद पुरवठा करता आला, ना पक्षाला बळकटी देता आली. एकनाथ शिंदेंच्या फुटीचा मोठा दणकाही उद्धव ठाकरे गटाला मुंबई महानगरात बसला. त्सुनामीच्या लाटेसारखे नेते, पदाधिकारी एवढेच नाही तर कधीकाळी निष्ठावंत म्हणवले जाणारे कार्यकर्तेही शिंदे-भाजपच्या वळचणीला गेले. दरम्यानच्या काळात राष्ट्रवादीचीही दोन शकले झाली, काँग्रेसची होती नव्हती शक्ती क्षीण झाली. लोकसभा-विधानसभेतील चढउतारानंतर मराठी भाषेच्या मुद्द्यावर उद्धव आणि राज ठाकरेंना एकमेकांच्या गळ्यात गळा घालण्याची उपरती झाली. आपसातील वादविवाद, रुसवे-फुगवे मागे सोडून उद्धव आणि राज ठाकरेंनी कौटुंबिक संबंध सुधारले. राजकीय व्यासपीठावर दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने मराठी माणसाच्या मनातली युती साध्य झाली, ठाकरे बंधूंच्या प्रेमात असणाऱ्यांना आकाश ठेंगणे वाटू लागले. हे खरे, परंतु मागच्या २० वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याचे दोघेही विसरले. सतत भूमिका बदलणाऱ्या राज ठाकरेंच्या मनसेची मुंबईतली ताकद या निवडणुकीत दिसून आली. लोकसभेला मुस्लीम, अल्पसंख्याक परप्रांतीय मतांची ताकद देणारा काँग्रेसचा हात उद्धव ठाकरेंच्या पाठीमागून निसटला. ठाकरे बंधूंनी मराठी माणसाला दिलेली भावनिक साद भाजपच्या चोख रणनीतीपुढे तोकडी पडली. ठाकरे बँड, मुंबईला तोडण्याचा डाव, शिवाजी पार्कवरील अदानींच्या नावे उभा केलेला व्यापारी भस्मासूरही तमाम मराठी मते एकवटण्यात असमर्थ ठरला. याउलट मेट्रोचे जाळे, सिमेंट काँक्रिटचे रस्ते, उड्डाणपूल, बिझनेस हब, पायाभूत सुविधांचे चित्र भाजपने तरुण मतदार, निओ मिडलक्लास अर्थात नव मध्यमवर्गाच्या मनात योग्यपणे बिंबवले. भलेही राज ठाकरेंच्या शिवाजी पार्कवरील सभेपुढे भाजप-शिवसेनेची सभा फिकी पडली, तरी महायुतीने आधीच जिल्ह्याजिल्ह्यात जावून विकासाचे नरेटिव्ह सेट केले होते. प्रचाराच्या रणधुमाळीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार एवढेच नाही, तर काँग्रेसचे नेते तीस-तीस, चाळीस-चाळीस सभा घेऊन उभा महाराष्ट्र पिंजून काढत असताना ठाकरे बंधूंनी ३-४ सभांवर आटोपते घेतले. महायुतीतल्या प्रमुख नेत्यांनी नगर परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकाही हलक्याने घेतल्या नाहीत. वेगवेगळे जिल्हे असोत, तालुके असोत किंवा गावस्तरावर जात मतदारांशी वन टू वन कनेक्ट करण्याला महत्त्वाचे मानले. मागच्या दोन-तीन वर्षात विविध योजना, सवलती, घोषणांचा पाऊस पाडला. विरोधकांना फोडत, माणसे खेचत विकासाचे राजकारण जराही थांबू दिले नाही. याउलट केवळ निवडणूक आयोगावर खापर फोडत निवडणुकीचे भवितव्य मराठी माणसांच्या हाती सोपवून मोकळे झालेले ठाकरे बंधू या लढाईत भाजपपुढे कुठेही टिकाव धरू शकले नाहीत. कधी नव्हे ते एमआयएम सारखा पक्ष मुंबईत ६ जागा मिळवतो. काँग्रेसच्या खात्यात १५ हून अधिक जागा पडतात, पण मनसेला साधा दुहेरी आकडाही गाठता येत नाही, हे अपयश ठाकरे बंधूंच्या रणनीतीतील चूक दाखवून देते.

आतापर्यंत ठाकरेंच्या हाती असलेल्या मुंबई महापालिकेच्या चाव्या खेचून घेत आपल्या कमरेला खोचण्याचे काम भाजपने एकनाथ शिंदेंना हाताशी घेत मोठ्या दिमाखात केले आहे. शिवसेना पक्षप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षात शिवसेनेच्या हातून मुंबईची सत्ता जाणे यापेक्षा मोठी नामुष्कीची बाब असू शकत नाही. वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस चोवीस तास निवडणुकीच्या मोडमध्ये राहून भाजपने महायुतीसह हे यश खेचून आणले आहे. हे यश खेचताना भाजपने नाशिकमध्ये शिंदे गट-अजित पवार गटाच्या आघाडीलाही धूळ चारली, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत अजित पवार-शरद पवारांच्या आघाडीला नमवून पवार कुटुंबाचा चिरेबंदी वाडा उद्ध्वस्त करून घटकपक्षांमध्ये आपणच मोठा भाऊ असल्याचे दाखवून दिले आहे. वसई-विरारमध्ये बविआ, परभणी, काँग्रेस-ठाकरे गट, लातूर, चंद्रपूर, भिवंडीमध्ये काँग्रेस आणि मालेगावमध्ये एमआयएमचा अपवाद वगळता राज्यांतील इतर सर्व महापालिकांमध्ये भाजपचीच लाट दिसून येत आहे. या लाटेपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहांशिवाय लढणारे भाजपचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निवडणुकीत केलेल्या अहोरात्र मेहनतीचाच हा परिपाक आहे...!!

**- ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर.**

# श्री क्षेत्र महाबळेश्वर येथे आज राजमाता जिजाऊ 'सुवर्णतुला दिन' महोत्सव

**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.१७, महाबळेश्वर (सातारा) :** स्वराज्याच्या संकल्पिका राजमाता जिजाऊ साहेब यांच्या मातृभक्तीचा, संस्कारांचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाचा साक्षीदार असलेला ऐतिहासिक 'सुवर्णतुला' प्रसंग यंदा ३६१ वर्षांचा होत असून, त्यानिमित्त रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी श्री क्षेत्र महाबळेश्वर येथे '३६१ वा सुवर्णतुला दिन महोत्सव' उत्साहात साजरा केला जाणार आहे. या महोत्सवाचे आयोजन श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



इतिहासात इ.स. १६६५ मध्ये पुरंदरच्या तहानंतरच्या कठीण काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मातोश्री राजमाता जिजाऊ साहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्री म हाबळेश्वर मंदिरात त्यांची सुवर्णतुला केली होती. हा विधी केवळ संपत्तीचे प्रदर्शन नसून 'राजा होण्याआधी मी एक पुत्र आहे' या भावनेतून व्यक्त झालेली मातृभक्ती आणि संस्कारांची जाणीव होती. या ऐतिहासिक घटनेच्या स्म रणार्थ दरवर्षी सुवर्णतुला दिन महोत्सव साजरा केला जातो.

महोत्सवाच्या दिवशी सायंकाळी ६ वाजल्यापासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ ते सहा तीस या वेळेत प्रतिकृती तुला पूजन, अभिषेक पूजा व दीपप्रज्वलन होणार आहे. त्यानंतर सायंकाळी साडेसहा ते रात्री आठ या वेळेत 'लोकप्रबोधन' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे. रात्री आठ ते साडेआठ या वेळेत मान्यवरांचे स्वागत व 'राजमाता जिजाऊ सन्मान' सोहळा होणार असून, यावेळी आंतरराष्ट्रीय तिरंदाज खेळाडू कु. आदिती गोपीचंद स्वामी हिचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. रात्री साडेआठ ते नऊ या वेळेत किल्ले स्पर्धेचे पारितोषिक वितरण व मान्यवरांचे मनोगत होईल. रात्री नऊ वाजल्यापासून पुन्हा फोक प्रबोधन आयोजन करण्यात आले आहे.

या ऐतिहासिक सोहळ्यास खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांची उपस्थिती लाभणार असून, राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद (आबा) पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, रोजगार फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार नितीनकाका पाटील, आम दार शशिकांत शिंदे , जिल्हा बँक संचालक राजुशेठ राजपुरे, मा.सभापती संजुबाबा गायकवाड, तसेच साताऱ्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

स्वराज्य, संस्कार, मातृभक्ती आणि इतिहासाचा गौरव करणारा हा प्रेरणादायी सोहळा अनुभवण्यासाठी शिवभक्तांनी, नागरिकांनी आणि पर्यटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री क्षेत्र महाबळेश्वर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### युवकाचा प्रामाणिकपणा; बँकेतून जास्त आलेली रक्कम केली परत

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**
**दि.१७, पालम (परभणी)**



सध्याच्या युगात प्रमाणिकपणा नष्ट झाला असे ऐकायला मिळते, पण पालम येथील संदीप हत्तीआंबिरे या युवकाने स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतुन जास्त आलेली रक्कम परत केल्याने प्रमाणिकपणा आजही कायम असे दिसून येते. दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पालम येथे आर्थिक व्यवहार करत असताना संदीप भुजंगराव हत्तीआंबिरे यांनी २५ हजार रुपये चा विड्रॉल भरलेला असताना कॅशियर प्रमोद कुमार वडजकर यांच्याकडून २५ हजार ऐवजी ४० हजार रुपये रक्कम नजर चुकीने अदा करण्यात आली. व संदीप हत्तीआंबिरे यांनी ती रक्कम घरी मोजली असता. आपल्याला १५ हजार ही रक्कम ज्यास्त आली असल्याचे लक्षात आले असता. त्यांनी पत्रकार राहुल गायकवाड यांच्याशी संपर्क साधलेला असता ही रक्कम आपल्याला बँकेला वापस करावयाची आहे असे सांगितले व त्यांच्या सोबत बँकेमध्ये जाऊन जास्त आलेली १५ हजार रुपये रक्कम परत करण्यात आली. यावेळी भारतीय स्टेट बँकेचे प्रभारी मॅनेजर गंगाधर मुखेडे, कॅशियर प्रमोद कुमार वडस्कर, सहाय्यक मॅनेजर पंकज कुमार अंधारे, सामाजिक कायकर्ते विलास चव्हाण, विजयकुमार घोरपडे, सलमान पठाण, गजानन देशमुख, अतुल धुळगंडे, नरसिंग रोकडे, शंतनु आव्हाड, गुत्तेदार सय्यद युसुफ, पत्रकार चांद तांबोळी, बालासाहेब फुलपगार, गुणवंत सराफ, लक्ष्मण गायकवाड, राहुल गायकवाड, मारुती नाईकवाडे, शांतीलाल शर्मा, आदी उपस्थित होते. सदरील युवकाचा प्रमाणिकपणा पाहून सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# राष्ट्रपती भवनातील 'ॲट होम' सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील ४ मान्यवरांना विशेष निमंत्रण

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१७, नवी दिल्ली :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित होणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठित 'ॲट होम' (At Home) स्वागत समारंभासाठी महाराष्ट्रातील चार मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या वतीने रायगड सगुणा बाग चे चंद्रशेखर भडसावळे, नांदेडचे सर्पदंश तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे, जळगावचे अरविंद गुलाब चौधरी आणि मुंबईचे स्टार्टअप उद्योजक आकाश शहा यांना विशेष निमंत्रण पाठविण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील सगुणा बागचे संस्थापक आणि सुप्रसिद्ध 'कृषिरत्न' चंद्रशेखर हरि भडसावळे यांच्या शेती, नैसर्गिक शेती, शून्य-नांगरणी तंत्र (SRT), जलसंवर्धन, कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रामधील उल्लेखनीय कामगिरीची दखल या निमि त्ताने घेण्यात आली आहे. १९७६ पासून शेती क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री.भडसावळे यांनी नेरळ येथील 'सगुणा बाग'ला एकात्मिक शेतीचा एक जागतिक दर्जाचा आदर्श नमुना म्हणून विकसित केले आहे. म त्स्यव्यवसाय, वनशेती, फलोत्पादन, गो-पालन आणि पर्यटन यांची सांगड घालणारे हे मॉडेल आज देशभरातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले असून, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास उंचावण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.वैद्यकीय क्षेत्रातील मानवतावादी कार्याबद्दल नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथील विख्यात तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे यांना हे विशेष निमंत्रण देण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील एम.डी. पदवी प्राप्त केल्यानंतर, शहरात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक अतिमागास आणि डोंगराळ अशा मुखेड भागाची रुग्णसेवेसाठी निवड केली. गेल्या ३० वर्षांपासून त्यांनी सर्पदंशावरील उपचारात क्रांती घडवून आणली आहे. १९८८ मध्ये मुखेड परिसरात सर्पदंशामुळे होणारा २५ टक्के मृत्यूदर आज डॉ.पुंडे यांच्या शास्त्रीय उपचार पद्धतीमुळे शून्य टक्क्यांवर आला आहे. त्यांच्या या कार्याची जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) दखल घेऊन त्यांची निवड 'राष्ट्रीय सर्पदंश मार्गदर्शन समिती'मध्ये केली आहे. याच सोहळ्यासाठी जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथील अरविंद गुलाब चौधरी यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री आवास योजने'चा लाभ घेऊन आपले हक्काचे घर मिळवणाऱ्या यशस्वी लाभार्थ्यांचे प्रतिनिधित्व ते या सोहळ्यात करणार आहेत. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना सर्वसाम ान्यांच्या जीवनात कसा बदल घडवत आहेत, याचे ते जिवंत उदाहरण ठरले आहेत.

तसेच मुंबईचे युवा उद्योजक आकाश शहा यांना स्टार्टअप्स आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील विशेष योगदानासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीत स्टार्टअप्स महत्त्वाची भूमिका बजावत असताना, आकाश शहा यांनी या क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीची दखल राष्ट्रपती भवनाकडून घेण्यात आली आहे.प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडणारा 'ॲट होम' हा एक अत्यंत प्रतिष्ठित सोहळा मानला जातो.

### के.रामलू साहेबांच्या पुण्यतिथी निमित्त के.रामलू शाळेत स्वयंशासन दिन साजरा



**अक्षराज : दत्ता हमंद**
**दि.१७, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील के.रामलू शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन शनिवार, दि.१७ जानेवारी २०२६ रोजी उत्साहात साजरा झाला. स्वयंशासन दिनाचे एक दिवशीय प्रिंसिपल शुभम भोरे तर व्हाय प्रिंसिपल अंसिका नरावाड हिने प्रशासकीय कामकाज सांभाळले. या स्वयंशासन दिनानिमि त्त दहावीच्या विद्यार्थी शिक्षकांनी पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी दिलेले विषयावर वेळापत्रकानुसार प्रभावी अध्ययन केले. या कार्यक्रम ाची सुरुवात के.रामलू कोटलावार यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या स्मृतीस पुष्पहार घालून करण्यात आली. के.रामलू कोटलावार यांची ही २९वी पुण्यतिथी आज शाळेत अभिवादन करून करण्यात आली. वर्गात असणाऱ्या विद्यार्थ्यांनीही केलेल्या अध्यापनाबाबत आनंद व्यक्त केला. दुपारच्या सत्रात स्वयंशासन दिनाची सांगता शाळेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी एक दिवसीय प्रिंसिपल शुभम भोरे म्हणाले की, खुर्चीवर बसून सर्वांना आदेश देणे, म्हणजे प्रिंसिपलचे काम किती सोपे आहे, असे मला वाटत होते. परंतु स्वतः एका दिवसासाठी प्रिंसिपल झाल्यानंतर सर्वांना आदेश देणे अतिशय अवघड काम आहे, हे मला कळले. शिक्षक आणि प्रिंसिपलचे काम अतिशय अवघड आहे. कामकाज करणे वाटते तेवढे सोपे नाही. एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना प्रभावी अध्यापन करणे, ही तारेवरची कसरत आहे. मी स्वतः तो अनुभवलो आहे. व्हाय प्रिंसिपल अंसिका नरावाड म्हणाल्या की, शिक्षक होणे हे आनंदाची व समाधानाची बाब आहे. वर्गात जावून विद्यार्थ्यांना शिकवण्यासारखा आनंद मला स्वयंशासन दिनानिमित्त मिळाला. विद्यार्थ्यांना ते मनापासून शिकविले. या स्वयंशासन दिनाचे सुरेख सूत्रसंचालन शिक्षक भास्कर वाघमारे यांनी केले तर संतोष भाले यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी उमाकांत कुलकर्णी, रमेश कासलोड, दत्ता हमंद, भूषण कोलंबरे, दावलबाजे, लाड, मिसाळे, आर्दीनी परिश्रम घेतले. अध्यक्षीय भाषण करत असताना साईरेड्डी ठक्कुरवार यांनी के. रामलू साहेबांच्या जुन्या आठवणीना उजाळा दिला त्यांनी जनतेच्या मनावर राज्य केलं शासन कसं चालवावं त्यांचं एक आदर्श उत्तम उदाहरण म्हणजे के. रामलू साहेब व तसेच ते पुढे बोलताना म्हणाले की, समाजाला असे वाटते की, सगळ्यात सुखी म्हणजे शिक्षक आहे. परंतु शिक्षक म्हणून आपण स्वतः जाणीव करतो, तेव्हा शिक्षकांना किती समस्या असतात, हे समजते. अनुभव घेतल्याशिवाय ते कळणार नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी केलेल्या सूचनांचे पालन करावे. शिक्षकांचे ऐकल्यास जीवनात यश मिळते. या एक दिवसीय स्वयंशासन दिनानिमित्त शाळेतील एकूण ५८ विद्यार्थी सहभागी झाले होते. उत्कृष्ट अध्यापन करणाऱ्या एक दिवसीय शिक्षकांचा प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून सन्मान करण्यात आला.यावेळी शाळेचे प्रिन्सिपल जे संभाजी, व्हाय प्रिन्सिपल एम सपना तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी उपस्थित होते.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमानिमित्त नरसी नामदेव येथे होणाऱ्या वारकरी संमेलन प्रचाररथाला जिल्हाधिकारी गुप्ता यांची भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१७, हिंगोली :** श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या त्याग, बलिदान व धार्मिक स्वातंत्र्याच्या संदेशावर आधारित हिंद दी चादर या राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने नरसी नामदेव येथे सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या वारकरी संमेलनाच्या जनजागृतीसाठी जिल्ह्यात फिरणाऱ्या वारकरी संमेलन प्रचाररथास आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शहरातील महात्मा गांधी पुतळा परिसरात भेट देऊन पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रचाररथावर साकारण्यात आलेल्या वारकरी संप्रदायाच्या समृद्ध परंपरेविषयी, संतांच्या शिकवणी, अभंग, हरिपाठ तसेच नरसी नामदेव येथे होणाऱ्या वारकरी संमेलनाच्या कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती घेतली. हिंद दी चादर कार्यक्रमातून श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांनी समाजासाठी दिलेल्या त्याग, समता, धार्मिक सहिष्णुता व मानवतेच्या मूल्यांशी वारकरी संप्रदायाचे विचार सुसंगत असल्याचे त्यांनी नमूद केले. वारकरी संप्रदायाने समाजाला दिलेला समतेचा, अहिंसेचा, सदाचाराचा व भक्तिमार्गाचा संदेश आजच्या पिढी पर्यंत पोहोचविण्यासाठी अशा प्रचाररथांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, या म ाध्यमातून सामाजिक एकोपा व सद्भावना वृद्धिंगत होईल, असे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

नरसी नामदेव येथे दि.१९ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या वारकरी संमेलनानंतर हा प्रचाररथ हिंगोली जिल्ह्यातील विविध तालुके व गावांमध्ये जनजागृती करत पुढे दि.२४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे होणाऱ्या हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी नांदेडकडे प्रस्थान करणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या माध्यमातून हिंद-दी-चादर कार्यक्रमाचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यात येणार आहे.

नरसी नामदेव येथील वारकरी संमेलन तसेच नांदेड येथे होणाऱ्या हिंद-दी-चादर कार्यक्रमामध्ये सर्व सम ाजघटकांनी, वारकऱ्यांनी व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. तसेच हे सर्व कार्यक्रम



यशस्वी, सुव्यवस्थित व सुरक्षितरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. वारकरी संप्रदायाची आध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा आणि श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानाचा गौरव करणारे हे उपक्रम समाजात एकोपा, बंधुता व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारे ठरतील, असा विश्वास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी व्यक्त केला. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी ३५० वा शहीदी समागम जागृती रथयात्रेचे हिंगोली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून गांधी चौकापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या रथयात्रेचे वेगवेगळ्या ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह आमदार तानाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर, श्रीराम दादा बांगर, शिलचंद्र देशमुख, महेश बियाणी, सजितसिंग शाहू, जगजीतराज खुराना, कन्हैयालाल नैनवाणी, अंबादास दळवी, स. सुखबीर सिंग अलग, सचिन तिवारी, दिलीप झंवर,स.चरन सिंग सेठी यांच्यासह पंजाबी, सिख, सिंधी, सिकलीगर, वाल्मिकी, बंजारा व इतर समाजातील भाविक सर्व मान्यवर, जिल्हा प्रशासनाचे विविध विभागाचे अधिकारी, संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी, वारकरी संप्रदायाचे पदाधिकारी, कीर्तनकार, भजनी मंडळांचे सदस्य तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदाची वल्सा नायर - सिंग यांनी घेतली शपथ

**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.१७, मुंबई :** भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी वल्सा नायर- सिंग यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अध्यक्षपदाची व गोपनीयतेची शपथ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित कार्यक्रमात दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केले.



कार्यक्रमास ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# भाजपच्या २२ पराभूत उमेदवारांचा नवनीत राणांविरुद्ध एल्गार

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१७, अमरावती :** अमरावती म हानगरपालिका निवडणुकीच्या निकालाने राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

गेल्या निवडणुकीत ४५ जागा जिंकणाऱ्या भाजपला यंदा केवळ २५ जागांवर समाधान मानावे लागले असून, या दारूण पराभवाचे खापर आता थेट



नवनीत राणा यांच्यावर फोडण्यात आले आहे. भाजपच्या २२ पराभूत उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून नवनीत राणा यांच्या हकालपट्टीची मागणी केल्याने अमरावती भाजपमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे.

**पराभूत उमेदवारांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात अत्यंत खळबळजनक आरोप केले आहेत. आम्ही भाजपचे निष्ठावान कार्यकर्ते होतो, मात्र आमचा पराभव विरोधकांनी नाही तर पक्षाच्याच नेत्या नवनीत राणा यांनी केला, असे या पत्रात म्हटले आहे.**

निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या पाच दिवसांत राणा यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवारांना 'डमी' ठरवून आपल्या 'युवा स्वाभिमान'च्या उमेदवारांचा प्रचार केल्याचा दावा या उमेदवारांनी केला आहे.